ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 6 | FEBRUARY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# आंबेडकरवादी समाज प्रबोधक - भगवान भालेराव गुरुजी

**डॉ. संजय गायकवाड**
**विभाग प्रमुख (इतिहास), मा.ह.महाडिक**
**कला व वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब.**

## प्रस्तावना :



सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील कसबे तडवळे या गावी भालेराव गुरुजी यांचा जन्म झाला. हे गाव सोलापूर-उस्मानाबाद जिल्ह्यातील सीमेवर गाव म्हणून ओळखले जाते. या गावाच्या नंतर मराठवाड्याचा प्रदेश सुरु होतो.[१-पृ.क्र.७] वडील भिवाजी सखाराम भालेराव यांच्या घरी दारिद्र्य असल्याने लहानपणीचे पाच-सहा वर्षे त्यांनी आपले आजोबा बापू एकनाथ वाघमारे यांच्या घरी सोपान व विश्वनाथ या मामासोबत घालवले. लहानपणीच त्यांची आई प्लेगने वारल्याने ते पोरके झाले होते. [२-पृ.क्र.१ ते ३] त्यामुळे घरात गुरुजी, लहान बहीण व वडील असे तिघेच होते. त्यांच्या वडीलांचा स्वभाव फार करारी होता. कुणाची हांजीहांजी, मेहरबानी किंवा कुणाचे बोलून घेणे आवडत नव्हते. जर एकाची चूक झाली तर कुणाचीही पर्वा न करता स्पष्टपणे बोलत होते. गावकीच्या कामापेक्षा स्वकष्टाच्या कामाला ते महत्व देत होते. दुसऱ्यांच्या शिळे, खरकटे खाण्यापेक्षा ते मजुरीची कामे करीत होते. गावातील मजुरी न मिळाल्याने हमाली करण्यास लातूरच्या रेल्वे स्टेशनला गेले. [२-पृ.क्र.६ ते ९]

## शिक्षण :

सोलापूर जिल्ह्यात सोलापूर, पंढरपूर, सांगोला, वैराग, पांगरी, येडशी आणि कसबे तडवळ[१-पृ.क्र.९] या ठिकाणी "लो कास्ट स्कूल" सुरु झाल्या होत्या. तेथे १९२० ला गुरुजींना प्रवेश घेण्यात आला. त्यांचे गुरुवर्य पद्माकर नागावकर यांनी शिक्षणाचे महत्व गुरुजींना सांगितल्याने त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी १९३४ मध्ये व्हर्नाक्युलर फायनलच्या परिक्षेत सोलापूर केंद्रात (जिल्ह्यात) दहाव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. चांगल्या मार्कानी पास झाल्याने शिक्षण प्रमुख कामरान यांनी त्यांना पुणे येथील ट्रेनिंग कॉलेजमध्ये पाठवले. येथेच शिक्षणाची महती त्यांच्या मनावर बिंबली. याच ठिकाणी त्यांना डॉ. बाबासाहेब आणि त्यांच्या चळवळीविषयी माहिती मिळाली. [२-पृ.क्र.६, ११ ते १३]

१९१४ मध्ये तडवळ कसबे, ता. बार्शी येथे हरिभाऊ तोरणे गुरुजी म्हणून आले. तोरणे मास्तर व बाबासाहेब यांचे जवळचे संबंध होते. ते चळवळीचे कार्य करीत होते. ते महार लोकांच्या बैठका घेवून महात्मा फुलेंच्या चळवळी, शिक्षणाचे महत्व यांचे वेळोवेळी मार्गदर्शन करीत हेते. तसेच त्यांचे काका काशिनाथ सोनवणे लोकल बोर्डाचे सदस्य आणि चळवळीचे कार्यकर्ते होते. ते डॉ. बाबासाहेबांच्या बहिष्कृत भारतमधील माहिती लोकांना सांगत चर्चा करत. या दोन व्यक्तींचा प्रभाव गुरुजींवर पडला होता. पुण्यातील ट्रेनिंग कॉलेजचे शिक्षण पूर्ण झ ाल्यावर २२ जून १९३६ ला शिक्षक म्हणून सलगर, ता. अक्कलकोट या ठिकाणी नेमणूक झाली. येथूनच त्याच्या कामाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.[प्रत्यक्ष मुलाखत]

## WHAT IS AMBEDKARISM?

1) Ambedkarism is a Movement of Liberation of Man in this life, suffering in the insulted, inhumane, irrational, unscientific, unjust and unequal social order; to establish right relationship between Man and Man (Gender neutral) in an Ideal Society of Justice - Liberty - Equality - Fraternity based on the New Revolutionary Ideology of Humanism (Manuski - Manavtawadi).

2) Ambedkarism is a Philosophy of bringing a Revolutionary Change in the Caste-Class-Race-Gender System by the Ideology of Humanism (Manuski-Manavtawad) and establish a New Social Order which is just, Equal, Equitable, Scientific, Rational and Humane; thereby liberating Man in this life.
3) Ambedkarism is a Philosophy which brings about Social and Cultural Transformation (Total Revolution) upholding Humane and Democratic principles of Equality-Liberty-Fraternity-Justice keeping the all round Development of Man (Gender neutral) as the vision and goal.
4) The Ideology to establish a Humanitarian Order by changing unequal order of Brahmanism is Ambedkarism.
5) The Ideology to create Man in a social order based on Equality-Liberty-Fraternity and Justice is Ambedkarism. In such order all are ensured of equal development and equal opportunity. (04 P.No. 1)

**सामाजिक कार्य :-**

**१) टपाल पोचच्या अन्यायातून मुक्तता :-** सलगर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील महार समाजाला पवित्र संस्कृती व धर्म या नावाखाली गुलामासारखे राबवून घेत होते. येथील तलाठी, पोलीस पाटील, कुलकर्णी, टपाल पोहचवण्यासाठी सोलापूर, वळसंग जवळच मैंदर्गी, ता. अक्कलकोट येथे पोस्ट असूनही महार समाजातील लोकांना पायी पाठवत होते. हा समाज प्रस्थापितच्या विरोधात कितीही त्रास झाला तरी बोलू शकत नव्हते. फक्त आपली गाऱ्हाणी गुरुजींपुढे मांडत होते. गुरुजींनी विचार करुन ही समस्या सोडवली. सलगरचे सर्व टपाल मैंदर्गी पोस्टला जमा करुन तेथून पोस्ट सर्टिफिकेट घेऊन यावयाचे असा विचार मांडला मात्र या चांगल्या विचाराला पोलीस पाटील, तलाठी, कुलकर्णी यांचा विरोध होता आणि घाबरलेला महार समाजही या गोष्टी करण्यास तयार नव्हता. प्रथम गावातील लोकांमध्ये बाबासाहेबांच्या चळवळीची माहिती सांगून त्यांच्यात स्वाभिमान जागा केला. नंतर सर्व टपालाची जबाबदारी स्वतः घेवून कामाला सुरुवात केली त्यामुळे तलाठी, पोलीस पाटील, कुलकर्णी गावातील लोकांवर दबाव टाकू लागली व गुरुजींनाही दमदाटी करु लागली. त्यावेळी धाडसाने गावातील महार समाजाने स्पष्ट केले की, आम्ही मैंदर्गी शिवाय कुठेही टपाल घेवून जाणार नाही, अन्यथा काम सोडू या प्रकरणात गुरुजींना यश आले. (प्रत्यक्ष मुलाखत)

**२) अमनु दरोडेखोरांचा बंदोबस्त :-** सलगर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर हे गांव महाराष्ट्र व कर्नाटकाच्या सीमेवर होते. गाव चोरीसाठी व शिंदीसाठी प्रसिध्द होते. दोन्ही राज्यातील चोरांचा येथे दबदबा होता. कर्नाटकातील अट्टल गुन्हेगार अमनुचा संपूर्ण गावावर दबाव होता. सर्व गाव त्याला घाबरत होता. एके दिवशी गुरुजी ज्याठिकाणी रहात होते तेथील घरमालकाने अमनुला जेवायला बोलावले. हे पाहून गुरुजींनी तुम्ही दोन्ही राज्याच्या गुन्हेगाराला आश्रय देता म्हणून पोलीस धरुन नेतील असे घरमालकाला स्पष्टपणे सांगितले. त्यामुळे घरमालकाचे डोळे उघडले. याच काळात हा गुन्हेगार पोलीसांच्या चकमकीत ठार झाला. (प्रत्यक्ष मुलाखत)

**३) बार्शी तालुका अस्पृश्य परिषद :-** अस्पृश्य परिषदेचे दुसरे अधिवेशन डॉ. विनायकराव / दादासाहेब मुळे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दि. २४ डिसेंबर १९३८ रोजी सायं. ६ वा. तडवळ (ढोकी, ता. बार्शी, जि. सोलापूर) येथे भरवण्यात आले. या अधिवेशनास मोठ्या प्रमाणात जनसमुदाय उपस्थित होता. (प्रत्यक्ष मुलाखत)

**४) महार जातीतील पहिला पोलीस पाटील :-** बार्शी तालुक्यातील दुधगाव येथील पोलीस पाटील पद रिक्त होते. गुरुजींनी या पदासाठी कलेक्टरकडे अर्ज करुन, शिफारस करुन महार जातीतील नाथा भालेराव यांना सनद मिळवून दिली. (प्रत्यक्ष मुलाखत)

**५) सोलापूर जिल्हा व मराठवाडा महार, मांग, वतनदार परिषद :-** आमदार जे.एस. ऐदोळे (पंढरपूर) व हरिभाऊ तोरणे गुरुजी यांच्या प्रयत्नातून तडवळ, ता. बार्शी येथे दि. २३/०३/१९४१ ला ही परिषद झाली. या परिषदेला भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्गदर्शन केले. गुरुजींनी या परिषदेसाठी लोकवर्गणीतून पैसा गोळा करुन आणि लोकांच्या मदतीने परिषद यशस्वी करुन दाखवली.

**डॉ. बाबासाहेबांचे भाषण :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनपर भाषणात, वतनदार महाराकडून विनावेतन कामे करुन घेतात, त्यांना पगार मिळवून देणे, गायरान व पडीक जमीन मिळवून देणे, निजाम सरकारच्या हद्दीतील वतनदार महार, मांग, रामोशी यांना पगार उपजीविकासंबंधीची मागणी निजामाकडे करीन. तसेच त्यांनी काँग्रेस धोरणावर टिका केली. अस्पृश्य समाजाविषयी बोलताना म्हणाले की, कसल्याही परिस्थितीत मुलांना

शाळेत पाठवा. शिक्षणाने समाजाचा उध्दार होतो. जुनी कामे सोडून द्या, स्वाभिमानाने जगा, अन्यायाचा प्रतिकार करा, इ. विषयावर मार्गदर्शन केले. (५-वृत्तांत)

**६) महार वतनात ऐक्य :-** गुरुजींनी तडवळ, ता. बार्शीच्या बाबासाहेबांच्या परिषदेला सर्व महार वतनदारांना एकत्र आणले होते. या वतनदारात गावकीचा संघर्ष पराकोटीला गेला होता. बोलणे नाही, एकमेकांच्या कार्यक्रमाला न जाणे, एकत्र न जेवणे, इ. अनेक गोष्टी घडत होत्या. गुरुजींना परिषदेच्या माध्यमातून सर्वांना प्रत्यक्ष एकत्र आणले. या वतनाच्या संघर्षाने समाजाची अधोगती होती, याची जाणीव करुन दिली आणि स्वत: वतनावर पाणी सोडून ऐक्याची हाक दिली. त्याला गावातील इतर वतनदारांनी पाठींबा दिला. त्यानंतर पुढील सर्व कामे एकत्रित करु लागले. (२-पृ.क्र. ३२ ते ४९)

**७) दुष्काळात मदत :-** गुरुजींनी १९७२ मधील महाराष्ट्रातील भयानक दुष्काळात ख्रिश्चन मिशनरीच्या जॉन्सन मॅडमच्या मदतीने पडसाळी, कवठे परिसरातील गर्भवती स्त्रियांना पौष्टीक आहार वाटण्याचे काम विना मोबदला समाजसेवा म्हणून केले. (५-वृत्तांत)

**समाजातील अनिष्ठ प्रथेविरुध्द मोहिम :-**

**१) महार-मांग सहभोजन :-** तडवळ (ढोकी) येथे बार्शी तालुका अस्पृश्य परिषदेतही महार-मांग एकमेकांना स्पर्श करुन घेत नव्हते. म्हणून गुरुजींनी दोन्ही समाजात प्रबोधन करुन दोन्ही समाजाला एकत्र तर आणले, त्याबरोबर एक क्रांतिकारक घटना घडवून आणली. ती म्हणजे परिषदेतच महार-मांग जातीतील लोकांना मांडीला मांडी लावून सहभोजन घडवून आणले. (२-पृ.क्र. २८)

**२) अनिष्ठ पध्दती बंद केल्या :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या तडवळ, ता. बार्शी या गावी येणार म्हटल्याबरोबर गुरुजींनी गावातील लोकांमध्ये वैचारिक जागृती घडवून आणली आणि स्पष्ट केली. डॉ. बाबासाहेबांच्या विचाराप्रमाणे स्वाभिमानाने जगले पाहिजे, मृत जनावरे ओढणे, जनावरांचे मांस खाणे, गावक्या करणे, इ. हलकी कामे सोडल्याशिवाय आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कार्यक्रम कसा करणार असा प्रश्न निर्माण केला. याचा परिणाम असा झाला की, सर्व वतनदारांनी गावकी सोडण्याची शपथ घेतली. तडवळ, ता. बार्शीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गदर्शनामुळे आपण कुणाचे गुलाम नाही, शिक्षणाने पिढीजात दारिद्र्य जाते हे लक्षात आल्याने लोक निर्भीड झाले. अन्यायाचा प्रतिकार करु लागले. गावातील रुढी प्रथांना विरोध करु लागले.

तडवळ, ता. बार्शीच्या सभेनंतर गुरुजींनी गावातील लोकांची चावडीत बैठका घेवून निश्चय केला की, यापुढे झाडलोट करणे बंद, जनावर टाकणे बंद, मेलेली जनावरे ओढणे बंद, प्रेताचे लाकडे टाकणे बंद, इ. परंपरागत कामे बंद केली.

तडवळ, ता. बार्शीच्या सभेनंतर परिसरातील महार-मांग समाजाने हलकी कामे करण्यास विरोध केला. यातूनच सवर्ण-दलित संघर्षाला सुरुवात झाली. अशावेळी गावकरी गुरुजीकडे तडवळला येत होते. अशावेळी गुरुजी रितसर डी.एस.पी., कलेक्टरर यांना तार देणे, निवेदन देणे, प्रत्यक्ष भेटणे, इ. द्वारे आपले प्रश्न मांडत होते. त्यामुळे एखादा दुसरा तुरुंगातही जात होता. या भितीने संघर्ष कमी झाला. मात्र बहिष्कार चालू झाला होता. (प्रत्यक्ष मुलाखत)

**३) कडकनाथ महाराजाचे परिवर्तन :-** गुरुजींना सभेचा प्रचार व वर्गणी गोळा करताना कापसी सावरगाव, ता. तुळजापूर येथील कडकनाथ महाराजांची भेट झाली. महाराजांनी डॉ. बाबासाहेब तडवळच्या सभेसाठी येणार म्हटल्यावर स्वत: फिरुन वर्गणी गोळा करुन दिली. हे पाहून गुरुजींनी त्यांचे मत परिवर्तन घडवून तडवळच्या सभेत डॉ. बाबासाहेबांच्या मार्फत जटा, दाढी काढण्यास भाग पाडले. त्यानंतर कडकनाथ महाराज डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीचे काम करु लागले. (प्रत्यक्ष मुलाखत)

**४) पोळा सणाचा प्रसंग :-** तडवळ, ता. बार्शी येथे भैरीसाहेब भावाचा दर्गा होता. आसपासच्या गावातील हिंदु-मुस्लिम लोक त्याला देव मानीत होते. या दर्ग्याला नवसापोटी बैल सोडले जात होते. या बैलांची पोळ्यादिवशी गावातून प्रथम मिरवणुक काढण्याची प्रथा होती. गावातील माणिक भालेराव यांना लष्करात मेजर पदावर बढती मिळाली होती. गावातील ते पहिले मेजर झाले होते म्हणून गुरुजींनी त्यांची मिरवणूक काढण्याचा निश्चय केला आणि पोळा सणादिवशी वाजतगाजत मेजरची गावातून मिरवणूक काढून बैलाची प्रथम मिरवणूक काढण्याची प्रथा मोडीत काढली. या प्रसंगामुळे गावातील हिंदु-मुस्लिमांच्या भावना दुखावल्या म्हणून बहिष्कार टाकला. मात्र गुरुजींनी आपले कार्य तसेच चालू ठेवले. (प्रत्यक्ष मुलाखत)

**५) सवर्ण-दलित सहभोजन :-** गुरुजींनी १९४८ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीला पुरोगामी विचाराचे तुळशीदास जाधव यांना तडवळ, ता. बार्शी येथे बोलावले होते. तुळशीदास जाधव यांनी डॉ. बाबासाहेबांचे विचार मांडून झाल्यावर त्यांचे विचार कृतीत आणण्याचा

विचार गुरुजींसमोर मांडला. विचारातून सहभोजन करण्याचे ठरले. त्यानुसार तुळशीदास जाधवांनी आपले विचार मांडून झाल्यानंतर गुरुजींच्या घरी पुरणपोळीचे सहजेवण घेतले आणि समाजासमोर एक आदर्श ठेवला ज्यामुळे सवर्ण-दलित समाजात ऐक्य करण्याचा प्रयत्न केला. [५-वृत्तांत]

**६) हुंडा विरोधी कार्य :-** गुरुजींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त तडवळ, ता. बार्शी येथे १० मे १९५० ला दादासाहेब गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आमदार भाई राऊळ, शाहीर जंगम स्वामी, मेंढे पाटील या व्यक्तींच्या उपस्थितीत महार समाजातील श्रीरंग चव्हाण व कृष्णाबाई यांचा विवाह बिगर हुंड्यासह दादासाहेब गायकवाड यांच्या हस्ते लावण्यात आले. त्याचबरोबर गावातील नव्याने जन्मलेल्या सर्व बालकांचे नामकरण करण्यात आले. [५-वृत्तांत]

**सामाजिक प्रबोधन :-**

**१) डॉ. बाबासाहेबांची अपसिंग येथील जयंती :-**

उस्मानाबाद जिल्ह्यातील अस्पृश्य शिक्षक देविदास कदम यांनी तुळजापूर तालुक्यातील अपसिंग या गावी डॉ. बाबासाहेबांच्या जयंतीसाठी गुरुजींना अध्यक्षस्थान दिले होते (१९३६). गुरुजींनी डॉ. बाबासाहेबांच्या कार्याची माहिती सांगून येथे नवचैतन्य निर्माण केले. [२-पृ.क्र. २८-२९]

**२) वाचनालयाची स्थापना :-**

गुरुजींनी आपल्या गावी तडवळ, ता. बार्शी येथे तरुणांचा "सन्मित्र तरुण संघ" स्थापन करुन या संघामार्फत वाचनालयाची स्थापना केली होती. यासाठी स्वतः, काही शिक्षक, समाजातील प्रतिष्ठीत लोकांकडून आर्थिक मदत घेवून पाच पत्र्याच्या खोलीत वाचनालय सुरु केले आणि तेथे समाचार जनता यासारखी वृत्तपत्रे दररोज येत होती. या वाचनालयाचे कौतुक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले होते. [६-वृत्तांत]

**३) अंधश्रध्दा निर्मुलनाचे कार्यक्रम :-**

गुरुजींनी डॉ. शितोळे यांच्या मदतीने तडवळ, ता. बार्शी या गावातील मुले भूतबाधा किंवा देवामुळे आजारी पडत नाहीत तर रोगजंतूने पडतात, हे पटवून सांगत असत. गावातील लोकांमध्ये इंजेक्शनची भिती मोठ्या प्रमाणात होतो म्हणून स्वतःच भिती नष्ट होण्यासाठी पाण्याचे इंजेक्शन डॉक्टर शितोळे कडून घेत होते. यामुळे औषधाने, इंजेक्शनने रोग बरा होतो, याची जाणीव लोकांमध्ये होवू लागल्याने देव, भूतबाधा, भोंदूबाबा यासारख्या अंधश्रध्दा कमी होऊ लागल्या. [प्रत्यक्ष मुलाखत]

**४) जलसातून प्रबोधन :-**

तडवळ, ता. बार्शीचे अर्जुन भालेराव मास्तर हे कवी, लेखक, जलसाकार होते. अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे अधिवेशन पुण्यातील अहिल्याश्रमात भरले होते. या अधिवेशनात अर्जुन मास्तर बरोबर गुरुजींनी जलसे गावून प्रबोधन केले. त्याचप्रमाणे आपल्या परिसरात गुरुजी अर्जुन मास्तर बरोबर जलशातून प्रबोधन करीत फिरत असे. [७-जाहिरात]

**निष्कर्ष :-**

१) भगवान भालेराव गुरुजींवर आंबेडकरी विचारांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात झाला होता.
२) भगवान भालेराव गुरुजींनी अस्पृश्यांच्या समाज प्रबोधनासाठी अस्पृश्यांसाठी परिषदा आयोजित केल्या.
३) भगवान भालेराव गुरुजींनी अस्पृश्यांना शासकीय नोकऱ्या मिळवून दिल्या.
४) भगवान भालेराव गुरुजींनी ग्रामीण भागात अस्पृश्यांमध्ये ऐक्य घडवून आणले.
५) भगवान भालेराव गुरुजींनी अनिष्ठ रुढी, परंपरा बंद केल्या.
६) भगवान भालेराव गुरुजींनी अंधश्रध्दा निर्मुलनाचे कार्यक्रम घेतले.
७) भगवान भालेराव गुरुजींनी सामाजिक क्षेत्रात वेगवेगळ्या मार्गांनी सामाजिक प्रबोधन केले.

**तळटिपा :-**

१) Kunte B.G., Solapur District Gazetteer, Gazetteer Department, Govt. of Maharashtra.
२) भगवान भालेराव, परिस स्पर्श (आत्मचरित्र).
३) भगवान भालेराव गुरुजी यांची प्रत्यक्ष मुलाखत घेवून.
४) Vijay Kumar, National Plan to Succeed in Ambedkarism (drafted).
५) संपादक, समाचार वृत्तांत-बातमी, मजकूर.
६) संपादक, जनता वृत्तांत-बातमी, मजकूर.
७) अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, पुणे येथील अधिवेशनाची जाहिरात.